








# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १७.१०.२०२५ | अंक नं. १६७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






















# भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे हृदयविकाराने निधन



**सरपंच ते ६ वेळा आमदार, मंत्री असा राहिला प्रवास, राजकीय क्षेत्रात शोककळा**

नगर - जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन आणि भाजपचे राहुरी, नगर, पाथर्डी मतदारसंघाचे विद्यमान आमदार शिवाजीराव भानुदास कर्डिले (वय ६७) यांचे १७ ऑक्टोबर रोजी सकाळी हृदयविकाराने निधन झाले. पहाटेच्या सुमारास त्यांना हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना तातडीने नगरमधील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचे दुर्दैवी निधन झाले आहे.

अहिल्यानगर शहाराजवळ असणाऱ्या बुऱ्हाणनगर गावचे सरपंच ते ६ वेळा आमदार, माजी मंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा अशा पक्षातून त्यांनी कामे केली.

शिवाजी कर्डिले यांचा जन्म १ जून १९५८ रोजी झाला होता. त्यांचा दुध व्यवसाय होता. परिसरातील नामांकित पहिलवान असलेले कर्डिले हे १९८४ ते १९९५ पर्यंत बुऱ्हाणनगर गावचे सरपंच होते. १९९५ मध्ये त्यांनी तेव्हाच्या नगर-नेवासा मतदारसंघात अपक्ष विधानसभेची निवडणूक लढविली आणि ते विजयी झाले. त्यानंतर १९९९ मध्ये शिवसेना भाजपा युतीच्या पाठींब्यावर पुन्हा अपक्ष आमदार झाले. २००२ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर काँग्रेस राष्ट्रवादी आघाडीच्या सरकारमध्ये *(पुढील मजकूर पान २ वर)*























जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगरमध्ये घर फोडून अमेरिकन डॉलरची चोरी

नगर - बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले ३० हजार ५०० रुपये किंमतीचे अमेरिकन चलन असलेले ३६० डॉलर चोरून नेल्याची घटना शहरातील विनायक नगर येथील वसंत विहार सोसायटी येथील बंगल्यात ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ या कालावधीत घडली आहे.

याबाबत सुनिल भगवंतराव कोल्हे (वय ६३, रा. बंगला नं.१ वसंत विहार सोसायटी, विनायक नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ११ ऑक्टोबर रोजी बंगल्याच्या दरवाजाला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. ५ दिवस मुलांकडे राहून ते १६ ऑक्टोबर रोजी सकाळी पुन्हा नगरमध्ये परतले. घरी आल्यावर त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहणी केली असता सर्वत्र उचकापाचक झालेली दिसली. तसेच त्यांनी कपाटात ठेवलेले ३६० अमेरिकन डॉलर चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख आणि पथकाने घटनास्थळी जावून पाहणी केली.

त्यानंतर याबाबत कोल्हे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५, ३३१ (३)(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऐन दीपावलीत वेबसाईट बंद; व्हॅट करदात्यांना फटका

नगर - महाराष्ट्र राज्यातील मूल्यवर्धित विक्रीकर (VAT) कायद्यानुसार नोंदणीकृत व्यापाऱ्यांना मासिक किंवा तिमाही विवरणपत्रके सादर करण्याची २० ऑक्टोबर २०२५ ही शासनाने निश्चित केलेली अंतिम तारीख आहे. विशेषत: परवानाधारक दारू विक्रेते तसेच इतर VAT कायद्यानुसार करपात्र व्यापाऱ्यांसाठी ही अंतिम मुदत अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र ऐन सणासुदीच्या दिवसात राज्य शासनाची अधिकृत mahavat.gov.in ही वेबसाइट ठप्प झाल्यामुळे व्यापारी वर्गास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

व्यापाऱ्यांकडून कराची योग्य रितीने भरपाई करूनसुद्धा वेबसाइट बंद असल्यामुळे विवरणपत्रके सादर करणे शक्य होत नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

## व्यापारी वर्गामध्ये तीव्र नाराजी : मुदतवाढीची मागणी

अनेक व्यापारी व कर सल्लागारांनी विविध वेब ब्राऊझर - क्रोम, मोझिला, मायक्रोसॉफ्ट इत्यादी प्रणालींवरून प्रयत्न केले तरीही विवरणपत्रके सबमिट केल्यानंतर ती प्रोसेस न होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर पुढे येत आहेत.

या पार्श्वभूमीवर, व्हॅट करदात्यांना नियमानुसार विवरणपत्रके दाखल करता न आल्यास त्यांच्यावर दंड व व्याज आकारले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे व्यापारी वर्गात तीव्र नाराजीचे वातावरण आहे. अनेकांनी विभागाकडे तक्रारी नोंदवल्या असल्या तरी अद्याप त्यावर कोणतीही ठोस कारवाई अथवा उत्तर मिळालेले नाही.

करदात्यांचा असा ठाम आग्रह आहे की, जेव्हा शासनाची वेबसाइटच काम करत नाही, तेव्हा करदात्यांना दंडात्मक कारवाईचा सामना करणे अन्यायकारक ठरेल. राज्य शासनाने तातडीने याची दखल घेऊन विवरणपत्रक सादरीकरणासाठी मुदतवाढ जाहीर करावी.

सणासुदीच्या दिवसात व्यापारी आणि कर सल्लागारांना अनावश्यक मानसिक ताण आणि आर्थिक तोटा सहन करावा लागणे ही खेदजनक बाब आहे. संबंधित विभागाने त्वरित तांत्रिक अडचणी दूर करून स्पष्ट सूचना देणे अत्यावश्यक आहे, अशी व्यापारी वर्गाची एकमुखी मागणी होत असल्याची माहिती नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन दत्तात्रय डोंगरे यांनी दिली.

# शहरातील अनेक नागरिकांना येत आहेत दहापटीने लाईट बील

**विद्युत महावितरणकडून नगरकरांची पिळवणूक, अखंडित २४ तास वीजपुरवठ्याची मागणी; आम आदमी पार्टीचा आंदोलनाचा इशारा**

नगर - शहरातील अनेक नागरिकांना अलीकडच्या काळात विद्युत बिल दहा पटीने वाढून येत असल्याचा धक्का बसला आहे. वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे आणि चुकीची बिलिंग प्रणाली याविरोधात आम आदमी पार्टीच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर विद्युत महावितरण कार्यालयात निवेदन देत नागरिकांना योग्य बिल आणि अखंडित २४ तास वीजपुरवठ्याची मागणी करण्यात आली. यामध्ये सुधार न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



आपच्या शिष्टमंडळाने विद्युत महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विशाल बोंदर्डे यांची भेट घेवून लाईट बिलासंदर्भात निवेदन दिले.

आपच्या शिष्टमंडळाने विद्युत महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विशाल बोंदर्डे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी आपचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, महिला अध्यक्षा ॲड. विद्या शिंदे, महासचिव दिलीप घुले, युवा उपाध्यक्ष विजय लोंढे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

नुकतेच शहरातील देवेंद्र सहाणे यांना दहा पटीने वाढीव बिल आले, तसेच इतर अनेक नागरिकांनाही अशाच प्रकारे वाढीव वीजबिलांचा फटका बसत आहे. नागरिकांनी तक्रार नोंदविल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष केले जात असून, बिल दुरुस्तीसाठी कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. नागरिकांना हे परवडणारे नाही; त्यांची सरळसरळ पिळवणूक सुरू असा आरोप करण्यात आला.

भरत खाकाळ म्हणाले की, नागरिकांना योग्य व न्याय्य बिल देण्यासाठी तत्काळ तपासणी करून ठोस उपाययोजना करावी. विद्युत महावितरणकडून नगरकरांची पिळवणुक केली जात आहे. वाढीव बिलाच्या समस्या कायम राहिल्यास संपूर्ण शहरातील नागरिकांना घेऊन विद्युत भवन, अहिल्यानगर येथे मोठे आंदोलन उभारू, असा इशारा त्यांनी दिला.

महिला अध्यक्षा ॲड. विद्या शिंदे म्हणाल्या की, नगर शहरात दररोज दोन ते तीन वेळा वीजपुरवठा खंडित केला जातो. दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात नागरिकांना त्रास नको, यासाठी वीज वितरणाचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. सणासुदीच्या काळात वीज गेल्यास तीव्र आंदोलन करण्याचे त्यांनी म्हटले.

वारंवार वीज जाणे आणि वाढीव बिल या दुहेरी समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले असून, दिवाळीपूर्वी लवकर महावितरणने पारदर्शक बिलिंग प्रणाली आणि अखंडित वीजपुरवठा करण्याची मागणी आपच्या वतीने करण्यात आली आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला गुजरात राज्यामध्ये पकडले

नगर - श्रीगोंदा तालुक्यातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुजरात राज्यातील सुरत येथे पकडले आहे. निलेश उर्फ सोन्या अशोक सावंत (वय २९, रा. चिंभळा, ता. श्रीगोंदा) असे आरोपीचे नाव असून त्याला व अपहरण झालेल्या मुलीला बेलवंडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणी बेलवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर अपहरण झालेली मुलगी मिळून येत नसल्याने मुलीचे नातेवाईक पोलीस अधीक्षक कार्यालय या ठिकाणी उपोषणाकरीता बसले होते. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उपोषणकर्ते यांची भेट घेवुन मुलीचा तात्काळ शोध घेणार असलेबाबत नातेवाईकांना आश्वासित केले. त्यानंतर त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अपहरण झालेल्या मुलीचा तात्काळ शोध घेवुन अपहरण करणारे आरोपीस ताब्यात घेणेबाबत आदेश दिले.

सदर आदेशानुसार पो.नि.किरणकुमार कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक दिपक मेढे, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, रिचर्ड गायकवाड, सोमनाथ झांबरे, महिला पोलीस अंमलदार सोनाली भागवत यांचे पथक तयार करून आरोपीचा शोध सुरु केला. या पथकाने गुन्हा ठिकाणी भेट देवुन तसेच मुलीचे नातेवाईकांकडे विचारपुस केली व तांत्रिक माहिती तसेच व्यवसायीक कौशल्याचे आधारे सदर गुन्हयातील आरोपी हा अपहरण केलेल्या मुलीसह गुजरात राज्यामध्ये पळुन गेलेला असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार पथकाने सुरत, गुजरात या ठिकाणी जावुन आरोपीचे वास्तव्याबाबत माहिती काढुन निलेश उर्फ सोन्या अशोक सावंत यास व अपहरण झालेली मुलगी यांना सुरत, गुजरात या ठिकाणावरुन ताब्यात घेण्यात आले आहे.

# आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे हृदयविकाराने निधन

(पान १ वरुन)

ते मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास राज्यमंत्री झाले. जुलै २००४ मध्ये ते जिल्ह्याचे पालकमंत्रीही झाले होते. २००४ ची विधानसभा निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लढवत ते तिसऱ्यांदा नगर-नेवासा मतदारसंघाचे आमदार झाले.

२००९ मध्ये मतदार संघाची विभागणी झाली. त्यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर अवघ्या ६ महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी भाजपात प्रवेश करत राहुरी-नगर- पाथर्डी मतदारसंघातून निवडणूक लढवत विजयी झाले. त्यानंतर २०१४ ला पुन्हा त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली आणि ते आमदार झाले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. मात्र ५ वर्षे आमदार नसतानाही जनसंपर्क त्यांनी कमी होऊ दिला नाही. त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ते सहाव्यांदा आमदार झाले होते. २०१४ च्या निवडणुकीत कर्डिले यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुरीत जाहीर सभा घेतली होती.

नगर तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या राजकारणात आपला ठसा उमटविलेल्या कर्डिले यांनी नगर बाजार समिती, खरेदी विक्री संघ, तालुका दुध संघ या सहकारी संस्थांवर आपली सत्ता गेल्या अनेक वर्षांपासून कायम राखलेली आहे. जिल्हा सहकारी बँकेचे ते सन २००७ पासून संचालक राहिले आहेत. सन २००८-०९ मध्ये ते बँकेचे पहिल्यांदा चेअरमन झाले. त्यानंतर पुन्हा मार्च २०२३ पासून ते चेअरमन म्हणून कार्यरत होते.

१७ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी अलका, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष असलेले अक्षय हा मुलगा, माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर, माजी नगरसेविका शितल जगताप, ज्योती अमोल गाडे तसेच कोमल राहुल वाकडे या ४ विवाहित मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप तसेच माजी महापौर संदीप कोतकर यांचे ते सासरे होते. कर्डिले यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे.



सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तसेच सोनम वांगचुक यांच्या अटकेविरोधात भाकपतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ला तसेच सोनम वांगचुक यांच्या अटकेविरोधात निदर्शने

**लोकशाहीवरील हल्ला थांबवा!; न्यायसंस्थेचा अपमान आणि लोकशाहीची मुस्कटदाबी होत असल्याचा आरोप**

नगर - सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर खुल्या न्यायालयात झालेल्या बूटफेकीच्या घटनेचा आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या बेकायदेशीर अटकेचा निषेध म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने १६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी लोकशाही वाचवा, न्यायसंस्थेचा अपमान थांबवा, सोनम वांगचुक यांना मुक्त करा! अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. या आंदोलनात भाकपचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, कॉ. स्मिता पानसरे, किसान सभेचे कॉ. बन्सी सातपुते, आयटकचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. आप्पासाहेब वाबळे, भारत अरगडे, भारती न्यालपेल्ली, प्रा. डॉ. सुभाष कडलग, कॉ. सतीश पवार, सगुना श्रीमल, संगीता कोंडा, लावण्या न्यालपेल्ली, कॉ. सुनील दुधाडे, राजेंद्र व्यवहारे, यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

भाकपच्या नेत्यांनी केंद्र व राज्य सरकार लोकशाहीची मुस्कटदाबी करत असल्याचा आरोप करत सरन्यायाधीशांवरील हल्ल्याला न्यायव्यवस्थेवरील थेट हल्ला म्हटले. सर्वोच्च न्यायालयासारख्या सर्वोच्च संस्थेवर अशा प्रकारे बूटफेक होणे हे भारतीय संविधान आणि न्यायव्यवस्थेचा अपमान आहे. या घटनेतील दोषींवर तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे; अन्यथा असा प्रकार वारंवार घडण्याचा धोका स्पष्ट केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायदा (एनएसए) अंतर्गत करण्यात आलेल्या अटकेचा तीव्र निषेध नोंदवला. त्यांच्या म्हणण्यानुसार, सोनम वांगचुक हे पर्यावरण, शिक्षण आणि सामाजिक न्यायासाठी अहिंसक मार्गाने लढणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या अटकेने लोकशाही मूल्यांचा घोर अपमान झाला असल्याचे म्हटले आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूटफेक करणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी व सोनम वांगचुक यांच्यावर लादलेला एनएसए कायदा मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करण्याची मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली.

# आ. कर्डिलेंच्या जाण्याने जनसामान्यांशी नाळ जोडलेले नेतृत्व हरपले : मुख्यमंत्री

मुंबई- ज्येष्ठ नेते, राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डीले यांचे आकस्मिक निधन हे राहुरीसह, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आघात आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार शिवाजीराव कर्डीले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

'आमदार कर्डीले यांच्या निधनामुळे जनसामान्यांशी नाळ जोडलेले, तळागाळातील घटकांच्या विकासासाठी साठी झटणारे नेतृत्व हरपले. ग्रामीण भागाची नाडी माहित असणारे, सहकार चळवळीच्या माध्यमातून सक्रिय अशा आमदार कर्डीले यांनी राहुरी मतदार संघ आणि अहिल्या नगरच्या विकासाचा सदैव ध्यास घेतला. याच जोरावर त्यांनी सलगपणे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे राहुरी मतदार संघातील एक संवेदनशील नेतृत्व हरपले आहे. आमदार संग्राम जगताप यांचे ते सासरे होत. आमदार कर्डीले यांच्या निधनाने कर्डीले आणि जगताप कुटुंबियांवर आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी असून त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद मिळावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना. ज्येष्ठ नेते आमदार शिवाजीराव कर्डीले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# तळमळीने काम करणारा लोकसेवक हरपला : उपमुख्यमंत्री

मुंबई - राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने एक लोकाभिमुख व संवेदनशील नेतृत्व हरपल्याची शोकभावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनाने संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. आमदार, राज्यमंत्री तसेच अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन अशा विविध पदांवर काम करताना त्यांनी नेहमीच लोकहिताला प्राधान्य देत समाजसेवेचं व्रत जोपासले. जनतेच्या प्रश्नासाठी तळमळीने काम करणारे ते खरे लोकसेवक होते. त्यांच्या कार्यामुळे राहुरीच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

आ. कर्डीले यांचे अकाली जाणे हे त्यांच्या कुटुंबासह सर्व कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का आहे. आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

# हॉटेलमधून रोकडसह विविध साहित्याची चोरी

नगर - रात्रीच्या वेळी हॉटेलच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम, फ्रीज व स्टील ची भांडी असा ३० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील बारदरी गावच्या शिवारात चांदबीबी महालाच्या पायथ्याला असलेल्या हॉटेल मध्ये १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ ते १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ या कालावधीत घडली.

याबाबत हॉटेलचालक मारुती आसाराम बडे (वय ३८, रा.मेहेकरी ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी बडे यांचे चांदबीबी महालाच्या पायथ्याला नगर पाथर्डी रस्त्यालगत हॉटेल आहे. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता त्यांनी हॉटेलबंद केले व कुलूप लावून घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते हॉटेल उघडण्यासाठी आले असता त्यांना हॉटेलमध्ये चोरी झाल्याचे निदर्शनास आले.

याबाबत त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिनकर भोसले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - मुंबई येथील प्रबुद्धनगर मधील रहिवासी ज्येष्ठ नागरिक बुद्धवासी दिनकर नारायण भोसले (वय ७०) यांचे १७ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय सैन्यदलातून ते मेजर पदावरून सेवानिवृत्त झाले होते.

# कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे घेवून जाणारा पिकअप पकडला

**३ जर्सी गायींची पोलिसांनी केली सुटका, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर - कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे घेवून जाणारा पिकअप नगर तालुका पोलिसांच्या पथकाने नगर तालुक्यातील जांब गावच्या शिवारात पकडला आहे. ही कारवाई १५ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० च्या सुमारास करण्यात आली असून यावेळी ३ जर्सी गायींची सुटका करत दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर तालुका पोलिसांचे पथक नगर पाथर्डी रस्त्यावर गस्त घालत असताना त्यांना जांब गावच्या शिवारात एक महिंद्रा कंपनीचा पिकअप जाताना दिसला. पोलिसांनी तो थांबवून पाहणी केली असता त्यात ३ जर्सी गायी दाटीवाटीने निर्दयीपणे बांधलेल्या आढळून आल्या. पोलिसांनी चालक बापू रेवजी लहारे (रा. पिंपळगाव माळवी, ता.नगर) यास याबाबत विचारणा केली असता त्याने सदर गायी या दस्तगीर कलीम कुरेशी (रा. जेऊर, ता.नगर) याच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी घेवून जात असल्याचे सांगितले.

पोलिसांनी या गायींची सुटका करत लहारे व कुरेशी यांच्या विरुद्ध पो.कॉ.विजय साठे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### पोटदुखीवर घरगुती उपाय

साधारणपणे, पोटदुखी ही एक सामान्य गोष्ट आहे. ती कोणालाही होऊ शकते, परंतु कधीकधी असे होते की पोट अचानक दुखू लागते. अशा परिस्थितीत, पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी काय करावे हे समजत नाही. गॅस किंवा ॲसिडिटी ही त्याची सर्वात मोठी समस्या आहे. अचानक होणाऱ्या पोटदुखीपासून तात्काळ आराम मिळवण्यासाठी घरगुती उपाय सर्वात प्रभावी आणि सुरक्षित आहेत. पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही पुदिन्याची पाने वापरू शकता. यासाठी, हिरव्या पुदिन्याची ५-६ पाने घ्या आणि त्यांना काळ्या मीठाने हळूहळू चावा. यामुळे तुमच्या पोटात तयार होणारा वायू निघून जाईल आणि तुम्हाला वेदनांपासून आराम मिळेल. गॅसमुळे होणाऱ्या पोटदुखीपासून आराम मिळवण्यासाठी ओवा देखील प्रभावी ठरू शकते. यासाठी, १/४ चमचा ओवा कोमट पाण्यासोबत खा आणि काही वेळ डाव्या कुशीवर झोपा. यामुळे तुम्हाला पोटदुखीपासून आराम मिळेल.

## पाककला

### लसणाचे आयते

**साहित्य :** लसुन पात, २ हिरव्या मिरच्या, ५ ते सहा लसूण पाकळ्या, मीठ चवीनुसार, तेल, १ वाटी गव्हाचे पीठ, १ टीस्पून हळद, १ टीस्पून गरम मसाला, २ टेबलस्पून रवा,

**कृती :** सर्वप्रथम लसूण पात स्वच्छ करून धुवून घ्यावी त्यानंतर त्याचे बारीक काप करून मिक्सरच्या भांड्यात घ्यावे सोबतच हिरव्या मिरच्या लसूण पाकळ्या कोथिंबीर घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्यावे. बारीक करण्याकरता थोडेसे पाणी घालावे. त्यात आता मिक्सर मधले वाटण एका भांड्यात काढून घ्यावे आणि त्यामध्ये गव्हाचे पीठ आणि रवा घालावा. चवीनुसार मीठ गरम मसाला आणि हळद घालावी. आणि थोडेसे दही घालावे आता हे मिश्रण डोशाप्रमाणे बनवण्याकरता थोडेसे पाणी घालून त्याला पातळ करावे. आता तवा गरम करावा तवा गरम झाल्यानंतर त्यावर पळीने डोसा पसरवावा त्याप्रमाणे आयते पसरवून घ्यावे. एक बाजू चांगली खरपूस भाजल्यानंतर आहेत ते पलटावेत आणि दुसऱ्या बाजूनेही छान परतावे दोन्ही बाजूंनी तेल लावून घ्यावे हे आयते तुम्ही गरमागरम कोरडेच खाऊ शकता किंवा लोण्या सोबत किंवा शेजवान चटणी सोबतही खाऊ शकता.

## वास्तू

❊ घरात बाथरूम व शौचालय यासाठी चांगली दिशा उत्तर-पश्चिम आहे. बाथरूम चा दरवाजा पूर्व किंवा उत्तर भिंतीला योग्य असतो. खिडकी पूर्व, पश्चिम, उत्तर असावी.

❊ तुटलेल्या मूर्ती किंवा फोटो - मंदिरात भेगा असलेल्या मूर्ती अशुभ मानल्या जातात. त्या ताबडतोब काढून टाका.

❊ देवघर हे नेहमी सागवानी लाकडापासून बनवलेले असावे. देवघर ईशान्य कोपरा म्हणजे उत्तर-पूर्व दिशेला असावे.

## सल्ला

❊ मिरची कापल्यानंतर हाताला लिंबाचा रस चोळल्याने मिरचीची जळजळ होत नाही.

❊ मिक्सरच्या पात्यांना धार लावण्यासाठी त्यावर महिन्यातून एकदा किंवा दोनदा जाड मीठ लावावे.

## सौंदर्य

दह्यात तांदळाच्या दाण्या एवढा चुना मिसळून खाल्ल्याने दोन आठवड्यात शरीराचा रंग गोरा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५

**धनत्रयोदशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, पूर्वा १५।४२, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.


**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८६ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जयजयकार ४) दोरा; तंतू; सूत; वाक ६) भांड्यात भात शिजताना होणारा आवाज ८) चापट; मऊ पदार्थाचा आघात ९) येणेजाणे; शेत; राबता; रान १०) वाघाचे ओरडणे १२) वाचून; शिवाय १५) मध्ये खंड न पडता एकसारखी पडणारी धार १७) परवानगीने काढलेली सुट्टी १९) विटीदांडूच्या खेळात दांडूने विटी जेथून कोलतात तो छोटा खड्डा २०) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या नाकातून ओवतात ती दोरी २१) टिकाव २२) खोडकर; हुर्यो उडविणारे

**उभे शब्द :-** १) एक धान्य; जव; सातू २) तानाजी मालुसरे यांनी कोंडाणा किल्ला चढण्यासाठी या प्राण्याचा उपयोग केला असे म्हणतात ३) क्रिकेटमध्ये सहा धावांचा फटका ५) लाल रंगाचा भाजीचा एक कंद ७) हुर्यो; कुचेष्टा; उनाडपणा ११) बांगड्या भरणारा किंवा विकणारा १२) सुसंगत नसलेला १३) नातेवाईक; आप्त १४) तुसडा; चिडका १६) लहान; छोटा (भाऊ वगैरे) १८) समज; ज्ञान २०) गती; स्पीड

शब्दगंध क्र. ७२८५ चे उत्तर



फिल्मीचक्कर क्र. १२०९ चे उत्तर



# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : चारित्र्याचा विकास हेच खरे शिक्षण होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मंदिरात जाण्याचे काही वैज्ञानिक फायदे आहेत का?

सामान्यतः मंदिरात जाणे धार्मिकतेशी संबंधित असते. परंतु मंदिरात जाण्याचे काही वैज्ञानिक आरोग्य फायदे आहे. जर आपण दररोज मंदिरात गेलो तर अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांवर नियंत्रण मिळवता येते.

मंदिरात अनवाणी चालल्याने या ठिकाणाची सकारात्मकता ऊर्जा पायांमधून आपल्या शरीरात प्रवेश करते. अनवाणी चालल्याने पायांमध्ये असलेल्या दाब बिंदूंवर देखील दबाव येतो, ज्यामुळे उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित होते.

दररोज मंदिरात जाऊन भुवयांच्या मध्ये कपाळावर टिळक लावल्याने आपल्या मेंदूच्या एका विशेष भागावर दबाव येतो. यामुळे एकाग्रता वाढते.

संशोधनात म्हटले आहे की जेव्हा आपण मंदिराची घंटा वाजवतो तेव्हा त्याचा आवाज आपल्या कानात ७ सेकंदांपर्यंत घुमतो. या दरम्यान, शरीरातील ७ आरामदायी बिंदू सक्रिय होतात. यामुळे ऊर्जा पातळी वाढण्यास मदत होते. मंदिरात हात जोडून पूजा केल्याने तळवे आणि बोटांच्या त्या बिंदूंवर दबाव वाढतो, जे शरीराच्या अनेक भागांशी जोडलेले असतात. यामुळे शरीराची कार्ये सुधारतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मंदिरात असलेले कापूर आणि हवनाचे धूर जीवाणू नष्ट करतात. यामुळे विषाणूजन्य संसर्गाचा धोका टळतो. याशिवाय मंदिराचे शांत वातावरण आणि शंखाचा आवाज मानसिकरित्या आराम देतो. यामुळे ताण कमी होतो. त्याचबरोबर दररोज मंदिरात जाऊन देवाची आरती केल्याने मेंदूचे कार्य सुधारते. यामुळे नैराश्य दूर होते.

### काशिदहन

चेदिदेशात पौंड्रकवंशात वासुदेव नावाचा एक राजा होऊन गेला. अज्ञानवशात स्वतःच्या क्षमता न जाणून घेताच मी भगवान विष्णूचा अवतार आहे, असे म्हणू लागला. एवढेच नव्हे, तर शंख, चक्र, गदा, पद्म ही भगवंतांची चिन्हेही त्याने धारण केली. मग त्याने श्रीकृष्णाकडे दूताकरवी निरोप पाठविला, की तुम्ही वासुदेव हे नाव, तसेच चक्र इत्यादी चिन्हे सोडावी व मला शरण यावे. श्रीकृष्णाने उलट निरोप पाठविला, की मी सर्व चिन्हे घालून उद्याच तुझ्या नगरीत येईन. तू सावध राहा.

त्याप्रमाणे श्रीकृष्ण गरुडावर बसून सर्व चिन्हांसह पौंड्रकाच्या राजधानीत पोचले. पौंड्रकाच्या मदतीसाठी काशिनरेश आपल्या महान सेनेसह आला. दोन्ही सेना कृष्णाच्या समोर उभ्या ठाकल्या. स्वतः पौंड्रक वासुदेव सर्व चिन्हे, गरुडध्वज, श्रीवत्सचिन्ह इत्यादींसह समोर आला. भगवानांनी एका क्षणात आपल्या शार्ङ्ग धनुष्यातून बाण सोडून शत्रूला घायाळ केले. गदा, चक्र यांनी सर्व सेनेचा नाश केला. आपल्या मित्राच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी काशिनरेश युद्धास सज्ज झाला.

भगवानांनी शा धनुष्यातून सोडलेल्या बाणांनी त्याचेही शिर कापून टाकले. मग श्रीकृष्ण द्वारकेस परत गेले. ते काशिनरेशाचे मस्तक उडून काशीस येऊन पडले होते. त्याच्या मुलाला कळले, की हे कृष्णाचे काम आहे. तेव्हा त्याने भगवान शंकराला प्रसन्न करून घेतले व वर मागितला, की कृष्णाच्या नाशाची काही योजना आखावी. त्यानुसार श्रीशंकरांनी अग्नीपासून एक अक्राळविक्राळ राक्षसी निर्माण केली. ती रागाने 'कृष्ण कृष्ण' म्हणत द्वारकेस पोचली.

भगवान श्रीकृष्णांनी तिच्यावर आपले सुदर्शनचक्र सोडले. त्या तेजाने ती राक्षसी जळू लागली व सैरावैरा धावू लागली. तिचा पाठलाग करीत ते चक्रही मागे जाऊ लागले. शेवटी हतबल झालेली ती राक्षसी काशीस येऊन पोचली. काशीतील सर्व सेना शस्त्रास्त्रे घेऊन त्या चक्राचा सामना करू लागली; पण त्या चक्राने सर्व सेनेला तसेच नगरीतील सर्व प्रजा, सेवक, हत्ती, घोडे यांना जाळून मगच ते शांत झाले व परत फिरुन श्रीकृष्णांच्या हातात येऊन स्थिरावले.



## जीवन का अमृत (भाग १)

किसी प्रकार भी निरुत्साहित महसूस ना करो, बल्कि प्रेम और भक्ति से पवित्र भजन-सिमरन में समर्पित रहो। आपको हर प्रकार की दया, सहायता और मार्गदर्शन ऊपर से मिलते रहेंगे ।

अहंकार इस रूहानी रास्ते पर उन्नति का सचमुच एक बहुत बड़ा दुश्मन है। सतुरु के प्रति प्रेम, ईंटों के भट्ठे की आग जैसा है। यदि आग को बुझा दिया जाए तो ईंटें ठीक से नहीं पकती और ऐसा ही आध्यात्मिक क्षेत्र में होता है। नामलेवा को सतुरु के प्रति अपने प्रेम को बचा कर और छुपाकर रखना चाहिए, ताकि उसकी उन्नति चुपचाप होती रहे।

ध्यान-अभ्यास. ४७

आपकी शिष्यों को दी गई यह सलाह उत्तम

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

है कि वे बेकार के कामों में समय बर्बाद न करें, बल्कि इस बेशकीमती समय का लाभ उठाएँ, ताकि वे रूहानी तौर से तरक्की कर सकें। पर यह संसार हर तरह के इंसानों से भरा पड़ा है और आप उनके साथ, जितना भी संभव हो, प्रेम और नम्रता के साथ पेश आयें। यह अच्छी बात है कि आप भजन और सिमरन, दोनों अभ्यासों के प्रति समर्पित हैं और अपने अंतर में प्रभु के साम्राज्य को खोज रहें हैं। इन मंडलों में प्रवेश करने हमेशा की जिंदगी और स्थिरता प्राप्त होती है। कोई भी बाहरी कामकाज लंबे समय तक नहीं रहते और हमारे लिए सहायक नहीं हो सकते। अब समय है कि हम अवश्य ही अपनी आगे की जिंदगी के लिए कार्य करें ।

खुश हूँ कि आप संसार से विरक्त (अलग) होते जा रहें हैं। यहाँ के सारे संबंधी और जानकार, कर्मों के नियम के अनुसार, लेन-देन चुकाने के लिए बने हैं। यह खुशी की बात है कि आप बाहर से तो अपने संबंधियों और दोस्तों के साथ प्रसन्नता से निभा रहें हैं, परन्तु अंतर में आप तेजी से यह महसूस करने लगे हैं कि वे सब आपकी आत्मा के लिए परदेसी हैं।

यह आपकी आंतरिक उन्नति में सहायता करेगा और आपको संसार के आकर्षणों से बचाकर रखेगा। आपका रास्ता साफ है। प्रेम और विश्वास के साथ कार्य करते रहो और आप दिन-ब-दिन इस रास्ते पर उन्नति करेंगे और अंतर में चढ़ाई करेंगे। जितना भी समय मिले, उसे आप प्रेम तथा भक्ति से भजन-सिमरन में लगा सकते हैं। स्नेही पिता हमेशा अपने बच्चों की देखभाल करता है, उनके फायदे के लिए कार्य करता है और अपनी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

कि इसे पाने लिये दूसरे लोगो के पीछे भटकता रहता है। शांति की तरंगों से ऐसी सुगंध निकलती है जो सभी को अच्छी लगती है। इस से तनाव खत्म हो जाता है।

मन को चैन मिलता है। हिंसक भाव मिट जाते हैं। योगी जहां तपस्या करते हैं वहां हिंसक जीव जन्तु भी मिलजुल कर रहने लगते हैं। खुशी के संकल्पों से खुशबू निकलती है जिस से सभी उमंग उत्साह से भर जाते हैं। जिस घर में बच्चो की किलकारियां सुनाई देती हैं और बहनों की चूड़ियां खनकती हैं वह घर सौभाग्यशाली होते हैं। दया भाव और कल्याण भाव से बहुत सुंदर खुशबू निकलती है जिस से तन मन को सकून मिलता है। ये ऐसी खुशबू है जिस से पत्थर दिल आत्मा भी बदल जाती है। सभी योगी विश्व कल्याण के आधार मूर्त हैं। इसलिये हमें सूक्ष्म में अच्छे विचार चारो ओर भेजने हैं। ये विचार तब पैदा होंगे जब हम गहनता से पढ़ेंगे, नहीं तो मोटी बुद्धि रहेंगे और सूक्ष्म विकारों की बदबू फैलती रहेगी। प्रशंसा के विचारों से ऐसी खुशबू निकलती है

### आज्ञा चक्र

जिस से हमें उत्साह मिलती है। इसलिये हर व्यक्ति अपनी तरीफ सुनने को लालायित रहता है। भाई भाई के विचार रखने से ऐसी खुशबू निकलती है जिस से सभी हमारी ओर आकर्षित होते हैं। सारा संसार अपना परिवार बन जाता है।

अहिंसा के विचारो से ऐसी खुशबू निकलती है जिस से सांप भी नहीं काटते और शेर जैसे जानवर भी मित्र बन जाते हैं। जिन विचारों से अच्छा अच्छा महसूस हो समझ लो कि उन विचारो से खुशबू पैदा हो रही है। जब हमें लोगो के गुण दिखते हैं तो उस समय विचारों से खुशबु निकलती है। जब कोई हमें अच्छा लगता है उन विचारो से खुशबू निकलती है। जब दूसरो को आगे बढ़ाने के विचार आते हैं, उनके हित की सोचते हैं, उन्हें धनवान बनाने की सोचते हैं, उन्हें निरोगी बनाने का सोचते हैं, नया नया पढ़ने का सोचते हैं, मन में

त्साह होता है तो ऐसे सब विचारों से खुशबू निकलती है। जब योग न लग रहा हो, मन में खुशी नहीं है, पढ़ने को मन नहीं कर रहा हो, काम करने का मन न हो तो समझो मन से बदबू निकल रही है। सदा मन में सात्विक विचार रखो चाहे परिस्थिति कैसी भी हो। एक शब्द बाबा (भगवान) आप प्यार के सागर हैं इसे रिपीट करते रहो इस से ऐसी खुशबू निकलती है जिस से शारीरिक वा मानसिक विघ्न नष्ट हो जाते हैं।

आज्ञा चक्र - २९ -मन-विचारो की दुर्गंध

हमारे बुरे विचारो से दुर्गंध निकलती रहती है। कई लोग कुतो से बहुत डरते हैं और वह चाहे कहीं चले जायें वहां के कुत्ते उनके पीछे लग जाते हैं। जब व्यक्ति डरता है तो डर के कारण उस के विचारो से दुर्गंध निकलती है। वह दुर्गंध ऐसी होती है जैसे कहीं मास का टूकड़ा जलाया जा रहा हो। मास की दुर्गंध कुत्तों को बहुत अच्छी लगती है वह समझते हैं यह उनका शिकार है। इसलिये वह उस व्यक्ति को

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, ट्रॅफिक पोलिसाने मला दंड केला लायसन्स नाही म्हणून
नवरा : अगं, पण तुझ्याकडे तर लायसन्स आहे ना
बायको : हो, पण त्यावरचा फोटो चांगला नाही आलाय म्हणून मी नाही दाखवले

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ युद्धातील शौर्य व बलीदान चक्र कोणास जाहीर झाले होते?

- मेजर सोमनाथ शर्मा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

आपले बाळ हुशार व्हावे, बुद्धिमान असावे, त्याने जीवनात यशस्वी होऊन नावलौकिक मिळवावा, असे प्रत्येक आई-वडीलांना आपल्या बाळाविषयी वाटत असते आणि ते वाटणे काही गैरही नसते. फक्त त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची तयारी पालकांनी ठेवली पाहिजे.

प्रत्येक बालकाची बुद्धिमत्ता ही जन्मत: वेगळी असते. काहींना ती उपजतच नैसर्गिक देणगी स्वरुपात जास्त मिळते. तर काहींची बुद्धी ही सर्वसामान्य असते, परंतु विशेष प्रयत्नांनी ती वाढविता येते. बऱ्याच अंशी बालकाला मिळणारी बुद्धी जन्मत: आनुवंशिक गुणांच्या समुच्चयाने मिळालेली असते. त्याशिवाय गर्भधारणेमध्ये गर्भवतीच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व्यवस्थित काळजी घेऊन गर्भाची वाढ प्राकृत होण्यावरसुद्धा बुद्धिमत्ता अवलंबून असते. गर्भधारणेच्या काळात गर्भवती मातेवर विशेष

### बौद्धिक विकास कसा करावा?

संस्कार करुन तिच्या आहार-विहाराकडे व्यवस्थित लक्ष देऊन बुद्धिमत्ता वाढविता येते, हे आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे आनुवंशिकतेने मिळणाऱ्या बुद्धिमत्तेसोबत आपण विशेष प्रयत्न करायला हवेत. गर्भधारणेपासून बालक सहा वर्षांचे होईपर्यंत त्याच्या मेंदूचा विकास अतिशय वेगाने होत असतो.

त्यातही पहिल्या तीन वर्षांपर्यंत मेंदूची बहुतेक सर्व वाढ पूर्ण झालेली असते. म्हणून या काळात जास्त कष्ट न घेताही बाळाचा बौद्धिक विकास करता येतो. त्यानंतरच्या पुढील तीन वर्षांच्या काळात, म्हणजेच वय वर्षे सहापर्यंत विशेष प्रयत्न करुन बाळावर वारंवार संस्कार करुन बुद्धिमत्ता वाढविता येते. परंतु सर्वसामान्यांचे म्हणणे असते, की आताच कशाला बाळाला शिकवायचे? शाळेत गेल्यानंतर त्याला शिकायचेच आह. हे वय त्याचे खेळायचे आहे. आताच त्याच्या मेंदूला कशाला ताण द्यायचा. परंतु बालक जन्म झालेल्या क्षणापासून वेगवेगळ्या गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक सते. त्याची थकणार नाही. असतो. एकूणच यावर्षे ही जास्त शिकण्याची क्षमता आपण शिकविण्याच्या क्षमतेपेक्षा खूप असते. आपण घरातील सदस्या प्रत्येकाने जरी शिकविण्याचा प्रयत्न केला, तरी आपण थकून जाऊ; परंतु बाळ ज्ञान ग्रहण कधीही थकणार नाही. म्हणून पहिल्या सहा वर्षांचा काळ हा त्याच्या भावी आयुष्याच रचण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# मराठा सेवा संघाची दक्षिण, उत्तर कार्यकारणी जाहीर

## दक्षिण जिल्हाध्यक्षपदी इंजि. प्रवीण दहातोंडे तर उत्तर जिल्हाध्यक्षपदी इंजि. विवेक लव्हाट यांची नियुक्ती



मराठा सेवा संघ अहिल्यानगर दक्षिण व मराठा सेवा संघ उत्तर या विभागाची जिल्हा कार्यकारिणी नियुक्तीचा सोहळा संगमनेर येथे पार पडला.

नगर – मराठा सेवा संघ अहिल्यानगर दक्षिण व मराठा सेवा संघ उत्तर या विभागाची जिल्हा कार्यकारिणी नियुक्तीचा सोहळा संगमनेर येथे संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरूषोत्तम खेडेकर, जेष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुनराव तनपुरे, बाळासाहेब शेटे, सहाय्यक प्रदेश समन्वयक तसेच मार्गदर्शक दीपक भदाणे, विभागीय अध्यक्ष राजेंद्र निबाळते, प्रदेश समन्वयक मनोज ढोकचौळे यांच्या मार्गादर्शनाखाली पार पडला. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बाळासाहेब शेटे सहाय्यक प्रदेश समन्वयक यांनी भूषविले तसेच कार्यक्रमास मार्गदर्शन शिवश्री प्रा. अर्जुनराव तनपुरे व मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरूषोत्तम खेडेकर यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी प्रदेश कार्यकारणीवर अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे व मनोज ढोकचौळे यांच्या निवडीबाबत त्यांना उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी संगमनेर विभागाचे उपविभागीय अधिकारी संगमनेर तहसीलदार अरुण उंडे तसेच संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नवनियुक्त उत्तर विभागासाठी विवेक लव्हाट (जिल्हा अध्यक्ष) व दक्षिण विभागासाठी प्रविण दहातोंडे (जिल्हाध्यक्ष) यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचबरोबर दक्षिण विभागाच्या कार्यकारणी वर विविध पदावर नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकारी यांना उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब खर्डे यांनी केले.

या वेळी कार्यकारी अभियंता हापसे, अमोल कवडे, गणेश हासे व जलसंपदा विभाग, कृषीविभाग, महसूल सार्वजनिक बांधकाम विभागातील इतर उपस्थित होते.

नव नियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे – अहिल्यानगर दक्षिण कार्यकारिणी पुढीलप्रमाणे– समन्वयक कर्जत प्रल्हाद शिंदे, सहसचिव (उपक्रम) हृषीकेश चव्हाण, समन्वयक अहिल्यानगर दक्षिण किशोर मरकड, कार्याध्यक्ष नेवासा अरुण घावटे, कार्याध्यक्ष महानगर श्रीकांत निंबाळकर, कार्याध्यक्ष ग्रामीण बापूसाहेब वराळे, उपाध्यक्ष (जनरल) संकेत कराळे, उपाध्यक्ष महिला श्रीमती धनश्री शिंदे, श्रीमती स्वाती साठे, सचिव अजिक्य थोरात, खजिनदार नितीन ढोले, सहखजिनदार गिरीश मरकड, पालक सदस्य सुधीर शिंदे, कार्यालयीन सचिव संतोष शिंदे, संघटक शहर मुक्ताजी शेळके, प्रशांत काकडे, वक्ता जनरल संभाजी निमसे, वक्ता शहर महेश बंनकर, वक्ता ग्रामीण संतोष निमसे, समन्वयक परिमल ह्याळीज, प्रचार प्रमुख ग्रामीण दिनेश शेळके, विभागीय सदस्य गणेश कवडे, सदस्य अभिजित पानसंबळ, स्वप्नील तनपुरे.

अहिल्यानगर उत्तर कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष विवेक लव्हाट, प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित संदीप पंडागळे, राजेंद्र बोरकर,

जिल्हा सहअध्यक्ष समन्वयक प्रमोद माने, ग्रामीण कार्याध्यक्ष समन्वयक प्रशांत वाकचौरे, ज्येष्ठ समन्वयक काशिनाथ गुंजाळ, उपक्रम कार्याध्यक्ष संदीप नवले, विकास डुंबरे, सरचिटणीस महेश गायकवाड, उपाध्यक्ष उपक्रम बापूसाहेब वराळे, प्रमुख संघटक संदीप देशमुख, कुशल संघटक अभिजीत देशमुख, उपाध्यक्ष महिला वैशाली गायकवाड, उपाध्यक्ष प्रशासन अनिरुद्ध धुमाळ, उपाध्यक्ष समन्वयक रजनीकांत कवडे, संदीप कोल्हे, उपाध्यक्ष प्रवीण सिनारे, अभिषेक पवार, शुभम शिरसाठ, प्रवक्ता निखिल आदिक, राहुल गुंजाळ, खजिनदार वैभव नवले, सहखजिनदार बिपिन कदम, प्रसिद्धीप्रमुख हर्षद गायकवाड, राहुल घारे, संघचिटणीस प्रणव वर्पे, संघटक निलेश आसने, अनिल थोटे, अमित चोळके कार्यकारणी जाहीर करण्यात आली व त्यांना नियुक्तीचे पत्र देखील देण्यात आले.

# एमआयडीसी न्यू एज फ्युएल वर्ल्ड येथे ऑनलाईन सीएनजी पंपाचा शुभारंभ



एमआयडीसी न्यू एज फ्युएल वर्ल्ड येथे ऑनलाईन सीएनजी पंपाचा शुभारंभ करण्यात आला.

नगर – भारत पेट्रोलियम कंपनीच्या एमआयडीसी पोलिस स्टेशन समोरील न्यू एज फ्युएल वर्ल्ड येथे ऑनलाईन सी.एन.जी. पंप कार्यान्वित झाला आहे. या ठिकाणी ग्राहकांना २४ तास सीएनजी इंधन उपलब्ध झाले आहे. या पंपाच्या शुभारंभ प्रसंगी बीपीसीएनचे टेरेटरी मॅनेजर मनोज जाधव, मार्केटिंग गॅस अनुपम श्रीवास्तव, इंजिनिअर ऑफिसर तरूण गर्ग, रोहित सूर्यवंशी, सेल्स ऑफिसर अनिश मुतालिक, पंपाचे संचालक ॲड. विकी मुथा उपस्थित होते.

अहिल्यानगर शहर व परिसराचा मोठा विस्तार होत आहे. तुलनेने स्वस्त व पर्यावरण स्नेही इंधन म्हणून ग्राहक सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांची खरेदी मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे शहर व परिसरातून या इंधनाला मोठी मागणी आहे. नगर–मनमाड महामार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचीही या पंपामुळे सोय होणार आहे. कंपनीकडून ऑनलाईन सीएनजी पुरवठा होत असल्याने दररोज २४ तास याठिकाणी सीएनजी उपलब्ध झाले आहे.

ॲड.विकी मुथा यांनी सांगितले की, न्यू एज फ्युएल वर्ल्ड गुणवत्ता, विश्वास आणि उत्तम सेवेसाठी नावाजले जाते. ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेवून याठिकाणी ऑनलाईन सीएनजी पंप सुरू करण्यात आला आहे. याचा अहिल्यानगर तसेच परिसरातील वाहनधारकांना लाभ होणार आहे. सीएनजी गॅस पर्यावरणासाठी स्वच्छ आहे, पेट्रोलियम इंधनाच्या तुलनेत खर्च कमी असून अधिक कार्यक्षमही आहे. सीएनजी प्रदूषण कमी करण्याबरोबरच इंजिनचे लाईफ वाढविण्यासाठी मदत करते. सीएनजी इंधनामुळे कार्बन मोनोक्साइड व हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी होते व हवेची गुणवत्ता सुधारते. सीएनजीमध्ये सल्फर व शिसे नसल्याने आम्ल पाऊस आणि श्वसनाचे आजार कमी होण्यास मदत होते. सीएनजीचे प्रज्वलन तापमान अधिक आहे. त्यामुळे आग लागण्याचा धोका कमी होतो. हा गॅस हवेपेक्षा हलका असल्याने गळती झाल्यास तो लगेच वातावरणात विरळ होतो व धोकादायक डबके तयार होत नाही. आधुनिक सीएनजी किटमध्ये स्वयंचलित शट ऑफ व्हॉल्व्ह आणि गळती ओळखणारी यंत्रणा असल्याने सुरक्षेची हमी मिळते. ग्राहकांनी एमआयडीसी येथील गॅस पंपला आवार्जून भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# युवक-युवतींनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श समोर ठेवावा

## डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

नगर – परिस्थिती बदलण्यासाठी युवक–युवतींनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श समोर ठेवावा. बिकट परिस्थितून आलेले कलाम सर्वोच्च राष्ट्रपती पदा पर्यंत पोहचले. समाजाला त्यांनी प्रेरक विचार दिले. त्यांच्या आयुष्यातील यश हे शिस्त, ज्ञान आणि मेहनतीचे प्रतीक आहे. राष्ट्रपती असूनही त्यांनी वैयक्तिक संपत्ती नव्हती; त्यांची खरी संपत्ती म्हणजे ज्ञान आणि विचारसंपदा होती. रात्रशाळेतील विद्यार्थीही याच मार्गावर चालून यशस्वी होतील. हस्ताक्षर हे व्यक्तीचे व्यक्तिमत्व दाखवते. विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुंदर आणि शिस्तबद्ध होणे म्हणजे त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा एक भाग आहे. मेहनतीशिवाय यशाला पर्याय नसल्याचे पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन तथा नाईट हायस्कूलचे माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी सांगितले.

हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज व भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरइंग युथ यांच्या सहकार्याने रात्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधार व व्यक्तिमत्व विकासावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी, रोटरी ई क्लबचे प्रकल्प प्रमुख डॉ. बिंदू शिरसाठ, प्राचार्य सुनील सुसरे, गजेंद्र गाडगिळ, सौ. वृषाली साताळकर, कार्यशाळेच्या प्रशिक्षिका व सखाराम मेहत्रे प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा कदम, तसेच दादासाहेब रूपवते विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक महेंद्र कदम आदी उपस्थित होते.



हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज व भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक करताना प्राचार्य सुनील सुसरे म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर त्यांचा सर्वांगीन विकास घडविला जात आहे. फक्त पुस्तकी ज्ञान देऊन न थांबता, त्यांना जीवनात सक्षमपणे उभे करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यांच्यासाठी विविध प्रकल्प राबविले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

रात्रशाळेच्या चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांनी शाळेत राबविल्या जात असणारे विविध उपक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली शैक्षणिक प्रगती करावी असे आवाहन केले.

कार्यशाळेच्या प्रशिक्षिका मनीषा कदम यांनी विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधार तंत्र, आकर्षक स्वाक्षरी लेखन, वारली पेंटिंग, हस्तकला, मायक्रो बिझनेस या विषयांवर सखोल माहिती दिली. तसेच व्यक्तिमत्व विकास व आत्मविश्वास वृद्धी यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत शिकलेल्या कलाकृतींचे प्रदर्शनही भरविण्यात आले, ज्याला उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी गजेंद्र गाडगिळ व वृषाली साताळकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले. आभार सौ. वृषाली साताळकर यांनी मानले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक महादेव राऊत, उज्वला साठे, मंगेश भुते, अशोक शिंदे, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, स्वाती होले, अनुराधा दरेकर, वैशाली दुराफे, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदी उपस्थित होते.

# सारडा महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा

## माजी राष्ट्रपती स्व.अब्दुल कलामांच्या व प्रेरणादायी साहित्यांचे प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



पेमराज सारडा महाविद्यालयात माजी राष्ट्रपती स्व.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा झाला.

नगर – हिंद सेवा मंडळ संचलित पेमराज सारडा महाविद्यालयात माजी राष्ट्रपती स्व.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा झाला. यानिमित्त महाविद्यालयात आयोजित स्व. अब्दुल कलाम यांच्यासारख्या विविध आदर्शवत साहित्यिकांच्या प्रेरणादायी पुस्तकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा वाचनालयाच्या सावेडी उपशाखेच्या अध्यक्षा प्रा.ज्योती कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा.राजेंद्र मारवाडे, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व गिरीश पाखरे आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. या साहित्यांच्या प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, अफाट बुद्धिमत्ता असलेले एपीजे अब्दुल कलाम यांना वाचनाचे अतिशय वेड होते. त्यांनी जे वाचन केले तेच जीवनात आचरणात आणून राष्ट्रपती म्हणून देशात आदर्शवत काम केले. याचा अर्थ आपण जे वाचतो ते आपल्याला सत्कार्य करायलाच लावते. म्हणून रोज एक तरी पुस्तकाचे पान वाचा, असे आवाहन केले.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, स्व. अब्दुल कलाम हे अत्यंत सर्वसामान्य जीवन जगणारे होते. एकदा ते नगरमध्ये आले त्यावेळेस रेल्वे स्टेशन वरून व्हीआरडीला ते टांग्यातून गेले होते, असे सांगून त्यांच्या साधेपणाचा व कार्याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

अजित बोरा यांनी अब्दुल कलाम यांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

प्रा.डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, पुस्तक आपले मस्तक उत्तम करत असल्याने ग्रंथालय हे औषधालयाप्रमाणे काम करत असतात. त्यामुळे सारडा महाविद्यालयातील समृद्ध ग्रंथालयाचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.

ग्रंथालय प्रमुख प्रा. राजेंद्र मारवाडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नवनाथ भोंदे यांनी केले. उपप्रचार्य मिलिंद देशपांडे यांनी आभार मानले.



सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्यावतीने पाथर्डी येथील हनुमान वस्ती येथील ५१ पूरग्रस्त कुटुंबांना किराणा माल, मिठाई व ब्लँकेट इत्यादी दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलची पूरग्रस्तांना मदत

नगर – तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्यावतीने करंजी, ता. पाथर्डी येथील हनुमान वस्ती येथील एकावन्न पूरग्रस्त कुटुंबांना किराणा माल, मिठाई व ब्लँकेट इत्यादी दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप करून सामाजिक दायित्व पार पाडले.

विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून या उपक्रमासाठीच्या वस्तू संकलीत करून विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते त्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी हनुमान वस्ती येथील राजेंद्र मरकड, राहुल अकोलकर, संजय दानवे व लहानू अकोलकर उपस्थित होते. या उपक्रमासाठी रूद्र पूजा फौंडेशनचे संचालक युवराज गुंड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी उज्वला पंडित, अर्चना केदार व किशोर उबाळे यांनी परिश्रम घेतले.



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी अहमदनगरच्या ओम सानपची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मल्लखांब आणि योगासनाचे प्रशिक्षक प्रणिता तरोटे आप्पा लाडाने अक्षय पावडे आदी. शेजारील छायाचित्रात मल्लखांब प्रात्यक्षिक करताना ओम सानप.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांबसाठी अहिल्यानगर येथील ओम सानप याची निवड

नगर – चेन्नई येथे २४ ते २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी अहिल्यानगर येथील श्री रामावतार मानधना चारिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मलखांबे योगा ट्रेनिंग सेंटरचा राष्ट्रीय मल्लखांब खेळाडू ओम घनश्याम सानप याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली. त्याबद्दल ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांनी ओमचा सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच अहिल्यानगर शहरांमध्ये मलखांब योगासनामध्ये उत्कृष्ट खेळाडू घडवण्यासाठी नेहमी तयार असल्याची तयारी त्यांनी याप्रसंगी दर्शवली.

आज या सेंटरच्या माध्यमातून अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू मल्लखांब आणि योगासन यासारख्या देशी खेळामध्ये घडवण्याचे कार्य अविरत सुरू आहे अशी माहिती सेंटरचे मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग यांनी दिली. तसेच या प्रसंगी मल्लखांब आणि योगासनाचे प्रशिक्षक प्रणिता तरोटे आप्पा लाडाने अक्षय पावडे आदी उपस्थित होते.

# पुणे बसस्थानकाजवळून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – स्वस्तिक चौकातील पुणे बस स्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या चाय स्पॉट या दुकानासमोर लावलेली मोटारसायकल (क्र.एम एच १६ सी झेड७४१२) ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी १ च्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी सुभाष नामदेव कावरे (वय ४२, काळकुप, ता.पारनेर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस हवालदार योगेश कवाष्टे हे करीत आहेत.

# विद्यार्थ्यात एक क्षमता दडलेली असते, फक्त ती ओळखून मेहनत घेण्याची गरज

## नौशाद सय्यद यांचे प्रतिपादन; सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी



सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली.

नगर – डॉ. कलाम हे केवळ एक महान वैज्ञानिक नव्हते, तर ते प्रत्येक भारतीयाच्या हृदयातील प्रेरणेचा झरा होते. त्यांनी अत्यंत गरिबीमध्ये बालपण घालवले, पण मोठे स्वप्न पाहिले आणि त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या जीवनाने आपल्याला शिकवले की मोठे स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्या. डॉ.कलाम यांनी सांगितले होते की झोपेत पाहिलेले नव्हे तर आपल्याला जागे ठेवणारे स्वप्नच खरे असते. त्यांनी विज्ञानाच्या माध्यमातून भारताला बलशाली बनविण्यासाठी कार्य केले. मिसाईल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान अमूल्य आहे. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांचे साधेपण आणि विद्यार्थ्यांवरील प्रेम होते. ते म्हणायचे प्रत्येक विद्यार्थ्यात एक क्षमता दडलेली असते, फक्त ती ओळखून मेहनत घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सय्यद यांनी केले.

माजी राष्ट्रपती व 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक सय्यद नौशाद, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़मा, शेख यास्मीन व शेख सुलताना आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक शिक्षक असलम पटेल यांनी करताना आपणही आपल्या जीवनात काहीतरी मोठे करू, प्रामाणिकपणे परिश्रम घेऊ आणि देशाच्या विकासासाठी योगदान देऊ असे सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

सुत्रसंचालन सुलताना शेख यांनी केले. यास्मिन शेख यांनी आभार मानले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## आवळ्याची ‘पॉवर’



आवळा या फळाचे आपल्याकडे धार्मिक व सांस्कृतिकही महत्त्व आहे. मात्र, त्याचे आरोग्यासाठी असलेले महत्त्वही कमी नाही. हा निसर्गातील सर्वात शक्तिशाली अँटिऑक्सिडंट आहे. आरोग्यासाठी आवळ्याचे सेवन अनेक प्रकारे लाभदायक ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. प्रदूषणामुळे शरीरातील पेशींमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी आवळा मदत करतो. भरपूर औषधी गुणधर्म असेल

आवळ्याचे फायदे जाणून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. आवळा वृद्धापकाळ रोखण्यासाठी आणि तारुण्यात आपल्याला बलवान बनवण्यासाठी औषध म्हणून कार्य करतो. अल्झायमरने त्रस्त असलेल्यांसाठी आवळा एक चांगले औषध म्हणून काम करतो. वंध्यत्वाच्या समस्येवर आवळा गुणकारी आहे. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणावापासून आराम मिळतो तसेचआवळ्याचे सेवन केल्याने शुक्राणूंची संख्या देखील वाढते. आवळा ॲलर्जीपासून बचाव करण्यास मदत करतो. आवळा पेशींमध्ये डीएनएचे संरक्षण करून रक्तवाहिन्यांमधील अँटी-फंगल, प्लेग इनहिबिटर, अँटी-कॅन्सर आणि रोगप्रतिकारक शक्ती म्हणून कार्य करतो. आवळ्यामध्ये १८०० मिलिग्राम व्हिटॅमिन सी, १७ मिलिग्राम कॅल्शियम, २६ मिलिग्राम फॉस्फरस, ३ मिलिग्राम ट्रॉप्टोफेन आणि २ मिलिग्राम मेथिओनिन असते. ते शरीरातील ऊतींचे पुनरुत्पादन करून सांधेदुखीपासून संरक्षण देते. आवळा त्वचेच्या आजारांपासून संरक्षण करतो. आवळ्यामध्ये डाळिंबापेक्षा ६० पट जास्त अँटिऑक्सिडंट्स असतात. आवळा सर्वात शक्तिशाली अँटिऑक्सिडंट मानला जातो. आवळा हे खरे तर उत्तम फळ मानले जाते.आवळ्यामध्ये हळदीपेक्षा दुप्पट अँटिऑक्सिडंट्स असतात, जे सुपरफूड मानले जाते.



## अवघ्या पाच वर्षांचा शेफ



‘आजच्या डिजिटल युगात मुले स्क्रीनच्या आकर्षणाला सहज बळी पडत आहेत. स्मार्टफोन, टॅब्लेटस्? आणि टीव्ही हे त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. पण या स्क्रीनवर आधारित जगातही म्हैसूरमधील एका पाच वर्षांच्या मुलाची गोड कहाणी सध्या चर्चेत आहे. बहुतांश मुलं फोन आणि टीव्हीला चिकटलेली असतात, तेव्हा हा छोटा मुलगा सुट्ट्या घालवण्याचा अनोखा आणि निरोगी मार्ग शोधतोय तो म्हणजे स्वयंपाक! अथर्व असे या पाच वर्षांच्या छोट्या शेफचे नाव असून, सुट्टीत मोबाईलवर वेळ घालवण्याऐवजी आपल्या आईकडून स्वयंपाक शिकण्यामध्ये त्याने रस दाखवला. अथर्वच्या या उत्साहाला पाहून त्याची आई श्रीविद्या यांनी त्याला प्रोत्साहन दिले. त्यांनी मसाले, डाळी आणि पाककलेची माहिती अथर्वला शिकवायला सुरुवात केली.

मांड्या शहरात राहणाऱ्या श्रीविद्या यांचा मुलगा अथर्व आता आपल्या आईसोबत घरासाठी स्वयंपाक करतो. कधी तो आईजवळ उभा राहून तिला स्वयंपाक करताना पाहतो, तिच्या पद्धती आत्मसात करतो. एवढंच नाही, तर हळूहळू या लहानग्या शेफने चपाती, डोसा, टोमॅटो भात आणि पुलावसारखे काही पदार्थ स्वतःच बनवायला शिकले आहेत. अथर्वच्या आईवडिलांचा मेणबत्तीचा व्यवसाय आहे. अथर्वची ही कहाणी आपल्याला आठवण करून देते की, डिजिटल युगातसुद्धा मुलांना पारंपरिक छंद जोपासायला प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे. स्वयंपाकासारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे मुलांच्या सर्जनशीलतेला चालना देते आणि त्यांचे स्क्रीन टाईम कमी करते. तंत्रज्ञानाच्या फायद्यांसोबतच, त्याचा अतिरेक मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर परिणाम करू शकतो.

नुकताच त्याच्या आईने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट केला आहे, त्यात ती म्हणते, ‘‘माझ्या पाच वर्षांच्या मुलासाठी खरेदी करणे खरोखरच कठीण आहे. त्याच्या तीन आवडी आहेत. एक म्हणजे मांजर. आमच्याकडे चार मांजरे आहेत; दुसरी म्हणजे प्लश टॉईज. त्याच्याकडे खूप आहेत आणि तिसरी आवड म्हणजे जुंगकूक. मी त्याला जुंगकूक भेट म्हणून दिला असता; पण तो कुठे मिळणार? जुंगकूक, जो दक्षिण कोरियन पॉप बँड बीटीएचा सदस्य आहे.

## दुर्मिळ नाणे, किंमत सव्वा चार कोटी

काही दुर्मीळ व जुन्या नाण्यांना लिलावात मोठीच किंमत मिळत असते. मात्र, अमेरिकेत फार जुन्या नव्हे, तर १९७५ मधील एका दुर्मीळ नाण्याला सव्वाचार कोटी रुपयांची किंमत मिळाली आहे. ‘१९७५ नो एस प्रूफ डायम’ या अमेरिकन नाण्याने लिलावाचा हा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. हे नाणे ५,०६,२५० डॉलर म्हणजे ४ कोटी २६ लाख ७४ हजार ९१ रुपयांना विकले गेले. हे नाणे ‘एस’ मिंट चिन्हाशिवाय चुकून जारी केले गेले, ज्यामुळे ते आधुनिक अमेरिकन नाण्यांपैकी एक बनले. अर्ध्या शतकाहून अधिक काळ खासगी ताब्यात राहिल्यानंतर प्रोफेशनल कॉईन ग्रेडिंग सर्व्हिसने १९७५ च्या डायमची पडताळणी केली आणि ग्रेड प्रूफ-६७ दिले. तसेच, सर्टिफाईड एक्सेप्टन्स कॉर्पोरेशनने त्याला मंजुरी दिली आहे. हे नाणे १९७५ साली तयार करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. हे २० व्या शतकातील सर्वात दुर्मीळ नाण्यांपैकी एक असल्याचे म्हटले जाते. लिलाव एजन्सीने सांगितले की, हे नाणे सॅन फ्रान्सिस्कोच्या मिंटने १९७५ मध्ये तयार केलेले अमेरिकन डायम होते. या नाण्यावर तुम्हाला एक चित्र दिसेल. याशिवाय प्रत्येक नाण्यावर बनवलेल्या या नाण्यावर ‘एस’चे चिन्ह बनवलेले नाही. हे ज्या प्रकारचे नाणे आहे, संपूर्ण जगात अशी दोनच नाणी अस्तित्वात आहेत. म्हणूनच हे नाणे इतके दुर्मीळ आहे. ग्रेट कलेक्शन नावाच्या लिलाव गृहाने या दुर्मीळ नाण्याचा ऑनलाईन लिलाव केला. कॅलिफोर्निया ग्रेट कलेक्शन्सचे अध्यक्ष इयान रसेल यांनी सांगितले की, हे नाणे सव्वाचार कोटी रुपयांना विकल्याचा आनंद आहे. लिलावापूर्वी हे नाणे ओहायोच्या तीन बहिणींकडे होते. मात्र, त्यांनी आपली ओळख गुप्त ठेवली आहे. पण लिलाव कंपनीशी बोलताना त्यांनी भावाच्या मृत्यूनंतर हे नाणे मिळाल्याचे सांगितले. त्यांच्या भावाकडे आणि आईकडे दोन नाणी होती, जी त्यांना वारशाने मिळाली होती; पण १९७८ मध्ये यातील एक नाणे परिवाराने १५ लाखांना विकले.



## यंदाचे वर्ष ठरणार सर्वात उष्ण?



जागतिक तापमानवाढ ही अवघ्या जगाचीच चिंता बनलेली आहे. उष्णतेच्या लाटा, भयानक वादळे आणि अचानक आलेला पूर या घटनांमुळं यंदा जगभरात हजारो लोकांना जीव गमवावा लागला आहे. जागतिक तापमानवाढीमुळं या घटनांमध्ये वाढ झाली आहे. युरोपियन हवामान विभागाने वर्तवलेल्या शक्यतेनुसार, २०२४ आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष ठरू शकते. वर्षभरातील जागतिक सरासरी तापमान पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा १.५ अंश सेल्सिअस जास्त असण्याची शक्यता आहे.

वैज्ञानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, तापमानवाढ हा धोक्याचा इशारा आहे. पुढील आठवड्यात अजरबैजान येथे होणाऱ्या संयुक्त राष्ट्र हवामान कॉन्फ्रेस ‘कॉप २९’ च्या आधीच आलेल्या या रिपोर्टने चिंता वाढवली आहे. रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायचीचे अध्यक्ष लिज बेंटले यांनी म्हटलं आहे की, आताच आलेल्या अहवालानुसार ‘कॉप २९’ साठी कठोर इशारा मिळालेला आहे. येत्या काही काळात तापमानात आणखी वाढ होऊ शकते. तापमानवाढ रोखण्यासाठी तत्काळ कारवाईची गरज भासू शकते. २०२४ च्या पहिल्या १० महिन्यांत जागतिक तापमान इतके वाढले आहे की, आता उरलेल्या दोन महिन्यांत तापमान वाढीतील घसरणच हा रेकॉर्ड बनवण्यापासून रोखू शकतो.

युरोपीय कोपरनिकस जलवायू परिवर्तन विभागाच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये तापमान पूर्व-औद्योगिक काळापेक्षा कमीत कमी १.५५ अंश सेल्सिअस अधिक असेल. पूर्व औद्योगिक काळातील सन १८५०-१९०० हा एक मानक काळ आहे. या काळात माणसाने औद्योगिक क्रांती केली. मात्र, एकीकडे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. पृथ्वीवर तापमान वाढ होण्यास सुरुवात झाली. अलीकडेच आलेल्या शक्यतांनुसार, २०१४ मध्ये १.४८ सेल्सिअसचा रेकॉर्ड तुटण्याची शक्यता आहे. मागच्या वर्षीच हा नवा रेकॉर्ड तयार झाला होता.

दरम्यान, हिवाळा सुरू झाला असला तरीही तामिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन मध्य आणि दक्षिण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. प्रशांत महासागरातील ला-निना स्थिती डिसेंबरअखेर सक्रिय होण्याचा अंदाज आहे.


## मिमांसा वामकुक्षीची



अनेकजण दुपारी जेवणावर आडवा हात मारून लगेचच आडवे होतात. दुपारची ‘वामकुक्षी’ या नावाने अनेक लोक तासाभराची का होईना झोप काढत असतात. अर्थात, दुपारच्या जेवणानंतर झोप येणे किंवा सुस्ती येणे, हे अगदी साहजिक आहे. ऑफिसमध्ये दुपारच्या जेवणानंतर आपल्या आजूबाजूचे बरेच लोक जांभई देताना दिसतात. कधीकधी आपल्याला शरीरातून सर्व ऊर्जा निघून गेली आहे आणि झोपेशिवाय पर्याय नाही, असेही वाटते. पण, दुपारच्या जेवणानंतर आपल्याला झोप का येते, हे माहिती असणे देखील गरजेचे आहे.

आहारतज्ज्ञांच्या मते, दुपारच्या जेवणानंतर झोप, आळस आणि अशक्तपणा जाणवणे सामान्य नाही. या अवस्थेला फूड कोमा म्हणून ओळखले जाते. या अवस्थेमागे कोणतेही ठोस कारण नाही आणि लोक बऱ्याचदा जेवणानंतर झोप येते म्हणून याकडे दुर्लक्ष करतात. पण, यामागे काही गंभीर कारणे देखील असू शकतात, ज्याकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकते. यापैकी काही कारणे अशी : मेंदूतील रक्ताभिसरण कमी होणे- आहारतज्ज्ञांच्या मते दुपारच्या वेळी हलक्या अन्नाचे सेवन करावे. पौष्टिक आहार घेतल्यास पचनासाठी अधिक ऊर्जेची आवश्यकता असते. अन्न पचविण्यासाठी पचनसंस्थेला अधिक रक्ताची आवश्यकता असते. दुपारच्या जेवणानंतर मेंदूतील रक्ताभिसरण कमी होते. हेच कारण आहे की दुपारच्या जेवणानंतर आपल्याला आळस आणि झोप येते. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे- आपल्या शरीराला कार्य करण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. हे आपण वेळोवेळी नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यासारख्या जेवणातून मिळवतो. आपण जे अन्न खातो त्यात असलेले पोषण हे आपल्या शरीराच्या ऊर्जेचा प्राथमिक स्रोत आहे. अन्नाच्या सेवनानंतर लगेचच पचन प्रक्रियेमुळे रक्तातील साखरेच्या पातळीत लक्षणीय घट होते. यामुळे तंद्री आणि झोप येते. तज्ज्ञांच्या मते, जे लोक नाश्ता सोडून थेट दुपारचे जेवण करतात त्यांना ही स्थिती जाणवण्याची शक्यता जास्त असते.

## माऊंट एव्हरेस्टची उंची का वाढतेय?



माऊंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वात उंच शिखर आहे. पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या शिखरांपैकी एव्हरेस्टची उंची समुद्रसपाटीपासून सर्वात जास्त आहे. या शिखराची उंची आणखी वाढत आहे. ही बाब जरा विचित्र वाटेल; पण ती पूर्णपणे खरी आहे. २००५ मध्ये चीनने त्याची उंची मोजली होती, तेव्हा ती ८८४४.४३ मीटर भरली होती. २०२० मध्ये चीन आणि नेपाळने संयुक्तपणे पुन्हा एव्हरेस्टची उंची मोजली आणि डेटा शेअर केला. नवीन आकडेवारीनुसार, माऊंट एव्हरेस्टची उंची ८,८४९ मीटर झाली आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एव्हरेस्टची उंची वाढण्यासाठी एक नदी कारणीभूत ठरत आहे. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनच्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे.

माऊंट एव्हरेस्ट हे जगातलं सर्वात मोठे शिखर नेपाळच्या हद्दीमध्ये आहे. नेपाळमध्ये त्याला ‘सागरमाथा’ नावाने ओळखले जाते. २०१७ मध्ये नेपाळने जगातल्या सर्वोच्च शिखराची उंची मोजण्यास सुरुवात केली होती. कारण २०१५मध्ये तिथे झालेल्या भूकंपाचा माऊंट एव्हरेस्टवरही परिणाम झाला आहे, असे मानले गेले. नंतर चीनही उंची मोजण्याच्या कामात सहभागी झाला. सुमारे दोन वर्षांनी हे काम पूर्ण झाले. २०२० मध्ये जेव्हा एव्हरेस्टची उंची जाहीर करण्यात आली, तेव्हा शास्त्रज्ञांना धक्का बसला. त्यानंतर लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधल्या संशोधकांनी याबाबत अधिक संशोधन केले.

या संशोधनानुसार, माऊंट एव्हरेस्टपासून ७५ किलोमीटर दूर वाहणाऱ्या अरुण नदीमुळे शिखराची उंची सुमारे ८९,००० वर्षांत १५ ते ५० मीटरने वाढली आहे. नदीच्या भूपातळीतल्या बदलांमुळे एव्हरेस्टची उंची दर वर्षी दोन मिलिमीटरने वाढत आहे. जीपीएस उपकरणांच्या मदतीने हा बदल स्पष्टपणे पाहिला जाऊ शकतो. लाखो वर्षांपूर्वी भारतीय आणि युरेशियन टेक्टॉनिक प्लेट्सची टक्कर (भूकंप) होऊन हिमालयाची निर्मिती झाली होती. आतापर्यंत याच टेक्टॉनिक प्लेट्सच्या घर्षणामुळे एव्हरेस्टची उंची वाढत आहे, असे मानले जात होते. पण, लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजच्या संशोधनातून एक अनोखा पैलू समोर आला आहे.

या संशोधनात सहभागी असलेले अॅडम स्मिथ यांनी दिलेल्या माहितीनुसार, समुद्रातील जहाजाच्या उदाहरणासह ही प्रक्रिया समजून घेता येईल. जर आपण समुद्रात जहाजातून सामान बाहेर फेकायला सुरुवात केली, तर जहाजाचा वरच्या वजनाचा भार कमी होतो आणि ते पाण्यात आणखी वर येऊन तरंगू लागतं. त्याचप्रमाणे, जेव्हा जमिनीवरून वाहणारी नदी गाळ वाहून आणते तेव्हा पृथ्वीच्या कवचाचा थर थोडा वर उचलला जातो. या प्रक्रियेला ‘आयसोस्टॅटिक रिबाऊंड’ म्हणतात. एडिंनबरा युनिव्हर्सिटीतील स्कूल ऑफ जिओ-सायन्सेसमधले प्रोफेसर ह्यू सिंक्लेअर यांचे म्हणणे आहे की, या संशोधनात ठळक केलेली कारणे योग्य वाटत असली तरी त्याबाबत काही प्रश्न निर्माण होत आहेत. ते म्हणाले, की एव्हरेस्टच्या उंचीसाठी नदीच्या पात्रातील धूप प्रक्रियेला कारणीभूत ठरवणे थोडे अनिश्चित वाटत आहे.

## किंग कोब्राच्या नव्या प्रजाती

जगातील सर्वात मोठा विषारी सर्प म्हणजे किंग कोब्रा. अन्य साप खाणारा व घरटे बांधून अंडी घालणारा हा साप अनेक बाबतीत लोकांच्या तसेच संशोधकांच्याही कुतूहलाचा विषय असतो. गेल्या १८८ वर्षांपासून किंग कोब्राची एकच प्रजाती असल्याचे समजले जात होते. मात्र, वास्तवात त्याच्या चार प्रजाती असल्याचे आता निष्पन्न झाले आहे.

यापूर्वी किंग कोब्राला ‘ओफिओफेगस हन्नाह’ या एकाच प्रजातीचे समजले जात होते. मात्र, आता नव्या संशोधनात आढळले आहे की, वेगवेगळ्या भागातील या चार प्रजातींमधील किंग कोब्राच्या शारीरिक रचनेपासून ते जनुकीय संरचनेपर्यंत अनेक बाबतीत भेद आहेत. यापूर्वी २०२१ मधील एका संशोधनातही म्हटले होते की, किंग कोब्रा सापांमध्ये जनुकीय भेद अस्तित्वात आहेत. या संशोधनाचा आधार घेऊनच हे नवे संशोधन करण्यात आले. संशोधकांनी काही म्युझियम स्पेसिमन्स म्हणजेच संग्रहालयात ठेवलेल्या किंग कोब्राचे काही नमुने घेऊन याबाबतचा अभ्यास केला. त्यावेळी त्यांना अनेक शारीरिक भेद दिसून आले. त्यावरून त्यांनी आता चार नव्या प्रजाती ठरवल्या आहेत. त्यामध्ये नॉर्दन किंग कोब्रा (ओ.हन्नाह), सुंदा किंग कोब्रा (ओफिओफेगस बंगारस), वेस्टर्न घाट किंग कोब्रा (ओफिओफेगस कलिंगा ) व ल्युझन किंग कोब्रा (ओफिओफेगस सॅल्वाटना). याबाबतच्या संशोधनाची माहिती ‘युरोपियन जर्नल ऑफ टॅक्सोनॉमी’च्या १६ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. कलिंगा फौंडेशनचे संस्थापक आणि कलिंगा सेंटर फॉर रेनफॉरेस्ट इकॉलॉजीचे संचालक गौरीशंकर पोगिरी यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांनी सांगितले की, हे संशोधन म्हणजे इतिहास घडवण्यासारखीच बाब आहे. किंग कोब्रा हे आर्द्रतायुक्त पर्यावरणात राहतात. विशेषतः, खुली जंगले तसेच पाणथळ जागी असलेल्या घनदाट मॅंग्रोव्ह झुडपांच्या परिसरातही आढळतात. भारतात पश्चिम घाटासह अन्यही काही ठिकाणी तसेच दक्षिण चीनपासून संपूर्ण आग्नेय आशियात किंग कोब्रा आढळतो. वेगवेगळ्या भागातील किंग कोब्राच्या शरीराचा रंग, पॅटर्न व आकारात बदल असतो, असे दिसून आले. २०२१ च्या अभ्यासावेळी किंग कोब्रांच्या डीएनएचे विश्लेषण करण्यात आले होते. त्यानुसार त्यांचे चार प्रमुख जनुकीय वंश असल्याचे आढळले. आता तेच चार वेगवेगळ्या प्रजाती असल्याचे निष्पन्न झाले आहे. या अभ्यासासाठी १५३ म्युझियम स्पेसिमन्सचा वापर करण्यात आला.



### अशा आहेत चार नव्या प्रजाती

- **नॉर्दन किंग कोब्रा(ओ. हन्नाह) :** हे पूर्व भारत, म्यानमार आणि इंडो-चायना परिसरातील हिमालयाच्या भागात आढळतात. पुढे थायलंडपर्यंतही त्यांची व्याप्ती आहे. या प्रजातीचे प्रौढ साप गडद काठाचे व पिवळ्या पट्ट्यांचे असतात.

सुंदा किंग कोब्रा (ओ. बंगारस) : हे मलाय पेनिन्सुलामध्ये तसेच ग्रेटर सुंदाच्या सुमात्रा, बोर्नियो व जावासारख्या बेटांवर आणि फिलिपाईन्समध्ये आढळतात. यापैकी बहुतांश किंग कोब्रा हे कोणतेही पट्टे नसलेले किंवा अतिशय अरुंद, फिकट पट्ट्यांचे व गडद काठाचे असतात.

- **वेस्टर्न घाट किंग कोब्रा (ओ. कलिंगा) :** हे भारतातील पश्चिम घाटात आढळतात. त्यांचे ‘ओ.बंगारस’ पेक्षा वेगळेपण त्यांच्या फिकट बँड्सभोवती नसलेल्या गडद काठांमुळे ओळखता येते.
- **ल्युझन किंग कोब्रा (ओ. सॅल्वाटाना) :** हे उत्तर फिलिपाईन्समधील ल्युझन बेटावर आढळतात. त्यांचे शरीर अतिशय कमानदार व फिकट रंगाचे असते. त्यांच्या शरीरावर अन्य प्रजातींसारखे गडद पट्टे किंवा काठ नसतात.

# बीड येथे होणाऱ्या महाएल्गार मेळाव्याच्या पाठिंब्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यामधील ओबीसी समाजबांधव रवाना

## आरक्षणाला धक्का लागू नये : बाळासाहेब भुजबळ

नगर – ओबीसी समाजाच्या मनात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. सदर जीआर रद्द करावा. या मागणीसाठी ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे भटक्या विमुक्त ओबीसी समाजाच्या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या ओबीसी समाजाच्या मेळाव्याला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगर शहरातील ओबीसी समाज बीड येथे जाणार आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठल्याही प्रकारचा धक्का लागू नये. ही सकल ओबीसी समाजाची मागणी आहे, असे प्रतिपादन ओबीसी व्हिजेएनटीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.



बीड येथे होणाऱ्या महाएल्गार मेळाव्याला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यामधील ओबीसी समाजबांधव रवाना झाले.

बीड येथे होणाऱ्या ना. छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी समाजाच्या महाएल्गार मेळाव्यासाठी अहिल्यानगर शहरातील माळीवाडा, नालेगाव, बालिकाश्रम रोड, बोरुडे मळा, विनायकनगर, सावित्रीबाई फुलेनगर, केडगाव, भिंगार, नागरदेवळे, नेप्ती, शेंडी या भागातील ओबीसी समाजाचे कार्यकर्ते टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथून रवाना झाले. याप्रसंगी ओबीसी नेते जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, उद्योजक संजय गारुडकर, ओबीसी व्हिजेएनटीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अर्जुन बोरुडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे शहराध्यक्ष ब्रिजेश ताठे, शहर कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, चंद्रकांत फुलारी, प्रदेश चिटणीस अनिल निकम, माळी महासंघाचे अध्यक्ष भूषण भुजबळ, गणेश घाडगे, मनोज फुलसौंदर, मनोज भुजबळ, नंदकुमार नेमाने, विवेक फुलसौंदर, संदीप दळवी, सुधाकर भुजबळ, प्रकाश इवळे, सुरेश आंबेकर, ॲड.राहुल रासकर, ज्ञानदेव खराडे, रामदास फुले, भरत गारुडकर, निलेश चिपाडे, बजरंग भुतारे, भास्कर चौधरी, एकनाथ व्यवहारे, रमेश चिपाडे, नारायण इवळे, बाळासाहेब नेमाणे, दादा फुले, रावसाहेब पुंड, बजरंग भूतारे, शामराव व्यवहारे, प्रशांत शिंदे, आनंद बोरुडे, ओमकार ताठे, स्वप्निल मुसळे, शुभम आव्हाड तसेच जिल्ह्यातून ओबीसी समाज, आ.भा.महात्मा फुले समता परिषद, ओबीसी व्हिजेएनटी, माळी महासंघ, बारा बलूतेदार महासंघ, भगवान महासंघ आदींसह ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

शरद झोडगे म्हणाले, महाराष्ट्र सरकारने काढलेल्या जीआर मुळे ओबीसीच्या आरक्षणामध्ये तफावत निर्माण झाली आहे. आरक्षण देण्यासाठी आमचा कुठलाही प्रकारचा विरोध नाही. परंतु ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे.

अंबादास गारुडकर म्हणाले, बीड येथे होणाऱ्या सभेसाठी जिल्ह्यातील ओबीसी समाज हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहे. पारनेर, श्रीगोंदा, राहुरी, कर्जत, जामखेड, नेवासा, पाथर्डी तसेच शहरातील ओबीसी समाज बीड येथे होणाऱ्या महाएल्गार मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहे.

अनिल निकम म्हणाले, ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी ना. छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे होणाऱ्या सभेसाठी मोठ्या प्रमाणात एकत्र येणार आहेत. तसेच यापुढील काळातही होणाऱ्या आंदोलनात ओबीसी समाज मोठ्या संख्येने एकत्र येईल. मनोज फुलसौंदर म्हणाले, या मेळाव्यासाठी माळी महासंघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

यावेळी ब्रिजेस ताठे, अभिषेक चिपाडे यांनी मनोगत व्यक्त केले.

# या वर्षीचे लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबरलाच



नगर – या वर्षी लक्ष्मीपूजन मुहूर्त २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.११ ते ८.३४ या कालावधीत आहे. या दोन तास २३ मिनिटांच्या प्रदोषकाळातच लक्ष्मीपूजन करावे. तसेच त्यांनी स्पष्ट केले की, २० ऑक्टोबर रोजी दुपारी ३.४५ पासून अमावास्या सुरू होत असून ती २१ ऑक्टोबर रोजी सायं. ५.५५ वाजेपर्यंत चालणार आहे. या संदर्भात धर्मसिंधु, पुरुषार्थ चिंतामणी, तिथिनिर्णय इत्यादी प्राचीन ग्रंथांचा दाखला देत घोलप म्हणाले की– जर आदल्या दिवशी प्रदोषकाळाची व्याप्ती असेल आणि दुसऱ्या दिवशी तीन प्रहरांपेक्षा अधिक काळ अमावास्या असेल तसेच प्रतिपदेची वृद्धी होत असेल, तर लक्ष्मीपूजन दुसऱ्या दिवशी म्हणजेच अमावास्येच्या दिवशीच करावे. त्यामुळे २१ ऑक्टोबर रोजी अमावास्या तीन प्रहरांपेक्षा अधिक आहे आणि प्रतिपदा समाप्ती सायं. ८.१० वाजता असल्याने प्रतिपदेची वृद्धीही आहे. म्हणून धर्मसिंधु ग्रंथातील नियमानुसार २१ ऑक्टोबर रोजीच लक्ष्मीपूजन करणे योग्य ठरते, असे ज्योतिष पद्धतीचे अभ्यासक अहिल्यानगर निंबळक येथील संतोष घोलप यांनी सांगितले.

उत्तर आणि पूर्व भारतातील काही भागांमध्ये २१ ऑक्टोबर रोजी सूर्यास्त ७.५५ वाजण्यापूर्वी होत असल्याने त्या भागात लक्ष्मीपूजनाचे मुहूर्त वेगळे असतील. सोशल मीडियावर अनेकदा चुकीची माहिती व्हायरल केली जाते. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता सूर्य–चंद्राच्या गतीवर आधारित खगोलशास्त्रीय गणनेनुसारच २१ ऑक्टोबर रोजी प्रदोषकाळात लक्ष्मीपूजन करावे, असे आवाहन घोलप यांनी केले.




## जैन वात्सल्य संस्थेकडून दिवाळीपूर्वी गरजू सहधार्मिक बंधूंना धान्यकिट, मिठाई व साड्यांचे वाटप

अनेक दशकांपासून जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने नियमित वितरण करण्यात येणाऱ्या धान्यकिट वितरणाबरोबरच विशेष दिवाळी फराळाचे साहित्य, मिठाई आणि महिलांसाठी नव्या साड्या देऊन आनंदोत्सव साजरा करण्यात आला. हा उपक्रम अकांक्षा प्रतीक चोरडिया व कल्पना पारस चोरडिया यांच्या हस्ते, ईश्वर धोका यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, सचिव विजय गुगळे, अशोक कोठारी, ईश्वर बोरा, सचिन कोठारी, आनंद चंगेड़िया, नूतन गांधी आदी उपस्थित होते.






# अवघ्या सात महिन्याच्या बाळावर आव्हानात्मक मेंदू शस्त्रक्रिया यशस्वी

## न्यूरोसर्जन डॉ.अमोल कासवा यांची यशस्वी कामगिरी



नगर – नगरच्या सावेडी रोडवरील न्यूरॉन प्लस हॉस्पिटलमध्ये न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांनी अवघ्या सात महिन्याच्या बाळावर मेंदुची गुंतागुंतीची व अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करून चिमुकल्याला नवीन जीवन देण्यात यश मिळवले आहे. अवघ्या सात महिन्याचे हे बाळ खेळता खेळता पडल्याने त्याच्या मेंदुला मार लागला होता. त्याला बेशुध्दावस्थेत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी तातडीने सिटी स्कॅन केले असता मेंदूच्या बाजूला डाव्या बाजूला गंभीर दुखापत झाली होती. रक्तस्त्राव होत होता. उजव्या बाजूच्या हातापायाची ताकद कमी झाली होती. त्यामुळे तातडीने शस्त्रक्रिया करण्याची गरज होती. याशिवाय जन्मत: या बाळाला हिमोफिलीया नावाचा आजार होता. या आजारात रक्तातील फॅक्टर ८ कमी असतो. त्यामुळे रक्त पातळ असते. परिणामी शस्त्रक्रिया आव्हानात्मक होती. डॉ.कासवा यांनी रूग्णाच्या नातेवाईकांना परिस्थितीचे गांभीर्य समजावून सांगितली व त्यांच्या परवानगीने ही शस्त्रक्रिया यशस्वी केली.



अवघ्या सात महिन्यांचे बाळ हॉस्पिटलमध्ये आले तेव्हा त्याची परिस्थिती गंभीर होती. त्याला जन्मजात हिमोफिलिया हा रक्त पातळ होण्याचा आजार होता. त्यामुळे शस्त्रक्रिया करणेही धोक्याचे होते. पुणे, मुंबईच्या मोठ्या रूग्णालयात नेण्याइतकाही वेळ नव्हता. अतिशय गंभीर परिस्थितीत डॉ.कासवा यांनी न्यूरॉन प्लस येथेच शस्त्रक्रिया करण्याचे ठरवून पालकांच्या संमतीने मेंदूवर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली. शस्त्रक्रियेनंतर बाळाला सहा ते सात दिवस व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. साधारण एकवीस दिवसांनी बाळ पूर्ण हालचाल करू लागल्यानंतर त्याला डिस्चार्ज देण्यात आला. आता बाळावर मुंबई येथे हिमोफिलीयाचे पुढील उपचार चालू आहेत.

या शस्त्रक्रियाच्या काळात अहिल्यानगर जिल्हा रूग्णालयामार्फत बाळाला फॅक्टर ८ चा सुरळीत पुरवठा झाल्याने रूग्ण बरा होण्यास आधार मिळाला. याशिवाय उपचारादरम्यान भूलतज्ज्ञ डॉ.भूषण लोहकरे, बालरोग तज्ज्ञ डॉ.सोनाली कणसे, डॉ.कवडे यांचेही सहकार्य लाभले. डॉ.कासवा म्हणाले, न्यूरॉन प्लस हॉस्पिटलमध्ये मेंदूच्या विविध आजारांवर परिपूर्ण उपचार उपलब्ध असल्याने नगरसह शेजारील जिल्ह्यातील रूग्ण विश्वासाने उपचारांसाठी येतात. हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत मेंदूच्या अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. या लहान बाळावरील शस्त्रक्रिया सुध्दा आव्हानात्मक होती. परंतु ती यशस्वीरित्या पूर्ण करून रूग्णाला सामान्य आयुष्य देता आल्याचा आनंद आहे.






# ऐन दिवाळीच्या काळात विशेष शिक्षक वेतनाविना; आनंदावर विरजण; तीन महिन्यांपासून वेतनविना

## विशेष शिक्षकांचा न्यायासाठी संघर्ष आजही कायम : उमेश शिंदे

नगर – दिवाळीच्या तोंडावर संपूर्ण राज्य सणाच्या तयारीत रमले असताना, अहिल्यानगर जिल्ह्यातील केंद्रस्तर विशेष शिक्षक मात्र तीन महिन्यांच्या वेतनाविना संकटात सापडले आहेत. दिवाळी साजरी होण्यासाठी तात्काळ वेतन अदा करण्याची मागणी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार १९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्ह्यातील १२८ विशेष शिक्षकांचे जिल्हा परिषद केंद्रशाळांमध्ये समायोजन करण्यात आले. नियुक्ती आदेश मिळताच सर्व शिक्षकांनी तत्काळ कार्यभार स्वीकारून आपल्या केंद्रशाळांवर हजेरी लावली. परंतु, दिव्यांग विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत या शिक्षकांवरच आज अन्याय होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

विशेष शिक्षकांचे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांचे वेतन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून कोणतेही लेखी आदेश किंवा ठोस कारण न देता रोखून ठेवण्यात आले आहे. या महिन्यांची बिले तयार होऊनही ती रिजेक्ट करण्यात आल्याचे समोर आले आहे. यामागील कारण अस्पष्ट असून, वेतन न देण्यामागील सत्यता शोधून काढण्याची मागणी शिक्षकांकडून केली जात आहे. तीन महिन्यांपासून पगार न मिळाल्याने अनेक शिक्षक घरखर्च, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च, दिवाळी खरेदी अशा सर्वच बाबतीत अडचणीत सापडले आहेत. कंत्राटी सेवेत संघर्ष केला, पण कायम झाल्यानंतरही संघर्ष कायम आहे, असे शिक्षकांनी हळहळ व्यक्त केली.

शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक शिक्षण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी कारवाईची भीती दाखवून दमदाटी केली जात असून, मीटिंगमधून अपमानास्पद वागणूक दिली जाते. शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनातून दूर ठेवून अपूर्ण असलेल्या निपुण महाराष्ट्र पुनर्चाचणी शाळांच्या भेटी घेण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चालू परीक्षांमध्ये व्यत्यय निर्माण झाला आहे. काम मात्र अधिकाराने करून घेतले जाते, मग वेतनाच्या बाबतीत संकुचित भूमिका का? असा प्रश्न शिक्षकांकडून विचारला जात आहे.

या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, वेतन रोखून ठेवून जाणूनबुजून मानसिक त्रास दिला जात आहे. त्यामुळे या अन्यायकारक वागणुकीविरुद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांनी तात्काळ हस्तक्षेप करून कारवाई करावी, अशी मागणी विशेष शिक्षकांच्या वतीने करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हेतू दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा आहे. पण त्या हेतूची पूर्तता करणारे विशेष शिक्षकच जर वेतनाविना राहिले, तर हा न्यायप्रवेशाचा उद्देशच अपूर्ण राहील. दिवाळीच्या ऐन काळात विशेष शिक्षकांना आर्थिक संकटात न ढकलता त्यांचा मान व हक्क कायम राखण्याचे म्हटले आहे.

# स्कूल बसमध्येच चालकाकडून विद्यार्थिनीसोबत छेडछाड

नगर – शहरात विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका नामांकित शाळेच्या विद्यार्थिनीला शाळेतून घरी सोडणाऱ्या बस चालकानेच तिच्यासोबत बसमध्येच अश्लिल चाळे केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी सावेडी उपनगरात हा प्रकार घडला. याप्रकरणी नराधम बस चालकाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाळू दादा वैरागर (रा. मांजरसुंभा, डोंगरगण, ता. नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या चालकाचे नाव आहे. याबाबत पीडित १५ वर्षीय अल्पवयीन मुलीने फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीनुसार, ती शहरातील हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीत शिकते. सध्या तिची सहामाही परीक्षा सुरू असल्याने ती दुपारी लवकर घरी परतत होती. बुधवारी दुपारी पेपर सुटल्यानंतर ती नेहमीप्रमाणे स्कूल बसने (क्र.एमएच २० डब्लू ९९३१) घरी निघाली.

सर्व मुलांना त्यांच्या थांब्यावर सोडल्यानंतर बसमध्ये पीडित मुलगी एकटीच राहिली होती. हीच संधी साधून चालक बाळू वैरागर याने तिच्या घराच्या जवळ बस थांबवून तिच्या सीटजवळ आला. त्याने मुलीचा हात धरून तिला ओढले आणि तिच्याशी लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. हा प्रकार घरी सांगितल्यास तुला मारून टाकीन, अशी धमकीही त्याने दिली असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, घटनास्थळी काही तरूणांनी हा प्रकार पाहिला आणि त्यांनी चालकाला जाब विचारत चोप दिला. घटनेची माहिती मिळताच पीडितेची आई आणि मामा घटनास्थळी दाखल झाले. घाबरलेल्या मुलीने सर्व हकीकत त्यांना सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी थेट तोफखाना पोलीस ठाणे गाठून फिर्याद दाखल केली. पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करत आहेत.

## चुकीची दुरुस्ती

दैनिक नवामराठाच्या गुरुवार दि.१६/१०/२०२५ च्या पान नं.७ वरील **ॲड.नाझिम अहमद इस्माईल शेख, ॲड.कुरेशी फैजान फारुक** यांच्या जाहीर नोटीसमध्ये नजरचुकीने विद्यमान मालकांचे नाव प्रल्हाद वासुदेव सोनार, **राजेंद्र वासुदेव सोनार, संजय वासुदेव सोनार** असे झाले आहे. त्याऐवजी प्रल्हाद वासुदेव सोनार, **राजेंद्र वामनराव सोनार, संजय वामनराव सोनार** असे गृहित धरावे, याची कृपया नोंद घ्यावी.

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहिल्यानगर यांचे कार्यालय,
पत्ता– सिंचन भवन,दुसरा मजला,फकीरवाडा, नगर–औरंगाबाद रोड, अहिल्यानगर – ४१४००१
ई–मेल पत्ता : eemd.amdngrwrd@maharashtra.gov.in दूरध्वनी क्रमांक– ०२४१–२३२५५८०

**ई–निविदा सूचना क्र. १५–३ सन २०२५–२६ (द्वितीय प्रसिद्धी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहिल्यानगर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | को.पं. बंधारा तांदळी (खोरे वस्ती) येथे लोखंडी वर्ग व क्र. १६६ नग पुरविणे व बसविणेचे काम. |
| जिल्हा | अहिल्यानगर |
| निविदेची अंदाजित किंमत रु. | रु.१७,९१,१६१/– |
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | दि.१७/१०/२०२५ ते दि.२४/१०/२०२५ |
| ई–निविदा उघडणे | दि.२७/१०/२०२५ |

जा.क्र.यांविअ/लेखा/निविदा/१५४६–२०२५
दि.१०/१०/२०२५
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहिल्यानगर यांचे कार्यालय.
जिमाका/नगर/जाहि/१५७/२०२५

**कार्यकारी अभियंता**
यांत्रिकी विभाग,
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **१.रोहन मकरंद कुलकर्णी व इतर चार,रा. भिंगार,ता.जि.अहमदनगर.** यांचे मालकी वहिवाटीचे आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडून रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅंक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे, असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** – डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहमदनगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे भिंगार येथील सर्व्हे नं.२०८/१/२ मधील प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे.

| प्लॉट नं. | चौ.मीटर | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|
| २५ | १५०.०० | प्लॉट नं.२६ | प्लॉट नं.६ व प्लॉट नं.७ | प्लॉट नं.२४ | ९.०० मीटर रोड |

या संपूर्ण प्लॉट बाबत...

दि.१७/१०/२०२५
अहमदनगर

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख, कुरेशी फैजान फारुक
जीपीओ रोड,कलेक्टर ऑफिसशेजारी, डावरेगल्ली,अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

# वीज चोरीप्रकरणी चौघांवर गुन्हे दाखल

नगर – महावितरणच्या पथकाने नगर तालुक्यातील खंडाळा गावात वीज चोरी शोधण्याची मोहीम राबवत एकाच दिवशी ४ ठिकाणी वीज चोरी पकडली असून या वीज चोरी करणाऱ्यांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात ४ वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत महावितरणचे सहाय्यक अभियंता दत्तात्रय देविदास दसपुते यांनी या फिर्यादी दिल्या आहेत. महावितरणच्या भरारी पथकाने ७ ऑगस्ट रोजी खंडाळा गावात वीजचोरी शोधण्याची मोहीम राबविली होती. त्यावेळी सचिन विजय गायकवाड यांनी ९४२ युनिट (१७ हजार ७१० रुपये), रोहिदास सहादू कांबळे ९५० युनिट (१८ हजार ४० रुपये), अमोल बारकू गिऱ्हे ९५० युनिट (१८ हजार ४० रुपये), पोपट चंद्रभान गव्हाणे ९४२ युनिट (१७ हजार ७१० रुपये) अशी वीज चोरी केल्याचे आढळून आले होते. या चौघांना चोरी केलेल्या विजेची देयके व तडजोड रकमेची देयके देण्यात आली होती. मात्र त्यांनी विहित मुदतीत सदर रक्कम न भरल्यामुळे या चौघांविरुद्ध ४ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

